# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ७३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 3 Noc 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 73 | Pages 4 | Rate 4 Rs


## पुणे पदवीधरसाठी रस्सीखेच

**मुंबई**–पुणे पदवीधर मतदारसंघात सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अरुण लाड प्रतिनिधित्व करत असल्याने, पुढील वर्षी होणाऱ्या या निवडणुकीसाठी दोन्ही बाजूंकडून मोठी रस्सीखेच सुरू झाली आहे. कोणत्याही परिस्थितीत ही जागा जिंकण्याचा चंग भाजपने बांधला असून, त्यामुळेच गेल्या काही दिवसांपासून पदवीधर मतदारांची मोठ्या प्रमाणात नाव नोंदणी सुरू आहे; तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे नेतेही ही जागा आपल्याकडेच राखण्यासाठी सरसावले आहेत. या मतदारसंघात भाजपचे मजबूत नेटवर्क असले तरी, काँग्रेसचे नेते सतेज पाटील आणि विश्वजित कदम यांचेही मोठे नेटवर्क असल्याने, दोन्ही बाजूचे कार्यकर्ते सध्यापासूनच निवडणुकीच्या कामाला लागल्याचे चित्र आहे.

# अखेर स्वप्न पूर्ण, भारताने जिंकला महिला विश्वचषक; दीप्तीने घेतल्या ५ विकेट



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अखेर भारताचे स्वप्न साकार झाले. भारताच्या महिला संघाने आयसीसी वर्ल्डकप पहिल्यांदाच जिंकला. नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय दक्षिण आफ्रिकेला भोवला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने ५० षटकांत २९९ धावा करण्याचे आव्हान दक्षिण आफ्रिकेला दिले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा डाव ४५.३ षटकांत २४६ धावांत आटोपला. भारताने फायनल मॅच ५२ धावांनी जिंकली. दक्षिण आफ्रिकेकडून ताझमीन ब्रिट्स २३ धावा करुन धावचीत झाली. अँनेके बॉश शून्य धावा करुन श्री चरणीच्या चेंडूवर पायचीत झाली. सुने लुस २५ धावा करुन शफाली वर्माच्या चेंडूवर तिच्याच हाती झेल देऊन परतली. मॅरिझॅन कॅप चार धावा करुन शफाली वर्माच्या चेंडूवर रिचा घोषकडे झेल देऊन परतली. सिनालो जाफ्ता १६ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर राधा यादवकडे झेल देऊन तंबूत परतली. अँनेरी डर्कसेन ३५ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर त्रिफळाचीत झाले. लॉरा वोल्वार्ड १०१ धावा करुन



दीप्ती शर्माच्या चेंडूवर अमनजोत कौरकडे झेल देऊन परतली. क्लो ट्रायॉन नऊ धावा करुन दीप्ती शर्माच्याच चेंडूवर पायचीत झाली. अयाबोंगा खाका एक धाव करुन धावचीत झाली तर नॅडिन डी क्लार्क १८ धावा करुन दीप्ती शर्माच्या चेंडूवर हरमनप्रीतकडे झेल देऊन परतली. क्लार्क बाद झाला आणि भारताच्या विजयावर औपचारिक शिक्कामोर्तब झाले. भारताकडून दीप्ती शर्माने पाच, शफाली वर्माने दोन तर श्री चरणी एक विकेट घेतली. दक्षिण आफ्रिकेचे दोन खेळाडू धावचीत झाले.याआधी प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने ५० षटकांत सात बाद २९८ धावा केल्या. भारताकडून स्मृती मंधानाने ४५ धावा, शफाली वर्माने ८७ धावा, जेमिमा रॉड्रिग्जने २४ धावा, हरमनप्रीत कौरने २० धावा, दीप्ती शर्माने ५८ धावा, अमनजोत कौरने १२ धावा, रिचा घोषने ३४ धावा, राधा यादवने नाबाद ३ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून अयाबोंगा खाकाने ३ तर नॉनकुलुलेको म्लाबा, नॅडिन डी क्लार्क आणि क्लो ट्रायॉन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## आर्यवैश्य महासभेच्या वतीने बॅटरीवर चालणाऱ्या प्रोस्थेटिक हाताच्या मोफत शिबिराचे आयोजन,गरजवंतांनी लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

अपघातात व ईतर कारणांमुळे आपला हात गमावलेल्या व्यक्तींसाठी आर्यवैश्य महासभा बीड, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन,इनाली फाउंडेशन पुणे व रोटरी क्लब ऑफ पुणे डाउन टाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने बॅटरीवर चालणाऱ्या इलेक्ट्रॉनिक प्रोस्थेटिक हाताच्या मोफत स्वरूपाच्या दोन दिवसीय शिबिराचे आयोजन बीड येथे करण्यात आल्याची माहिती महासभेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत महाजन व सचिव अजय रुद्रवार यांनी दिली आहे. बॅटरीवर चालणाऱ्या या इलेक्ट्रॉनिक प्रोस्थेटिक हात बसवण्यासाठी लाभार्थीला कोपऱ्या पासून पुढे ४ इंच हात असणे आवश्यक आहे हात बसवण्यासाठी कोणत्याही शस्त्रक्रियेची गरज नाही त्यामुळे हे बसवणे व काढणे सोपे आहे व हे हात दिसायला सुंदर व वजनाला हलके आणि मजबूत असे आहेत त्यामुळे अनेकांना आपले आयुष्य



सुंदर व सुकर बनवण्यासाठी मदत होणार आहे.शिबीर दिनांक ८ व ९ नोव्हेंबर रोजी बीड येथील नवगण कॉलेज रोड वरील जीवनज्योत हॉस्पिटल या ठिकाणी पार पडणार आहे तरी यासाठी खाली दिलेल्या मोबाईल क्रमांकावर नोंदणी करावी व या शिबिराचा लाभ गरजवंतांनी घ्यावा असे आवाहन प्रोजेक्त चेअरमन डॉ.निलेश जगदाळे ७७०९७८२१३३,वैभव झरकर ९४२२९३२२९२, राहुल बोरा,डॉ.प्रकाश कोंका यांनी केले आहे.

## यश ढाका हत्या प्रकरणी जनआक्रोश मोर्चाला हजारोंच्या संख्येने सामील व्हा–भारत कांबळे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी.**

बीड शहरातील वर्दळीच्या ठिकाण म्हणजे माने कॉम्प्लेक्स या माने कॉम्प्लेक्स या ठिकाणी काही दिवसापूर्वी यश ढाका वय वर्ष २२ या तरुणाची एका टोळक्यांकडून निर्दयी पोटात धारदार शस्त्र खुपसून निघृण हत्या करण्यात आली ,या घडलेल्या घटनेने संपूर्ण बीड जिल्हा हादरला,आणि संपूर्ण बीड जिल्ह्याने हळहळले मात्र ज्या टोळीने हा खून केला त्या मधील चार आरोपी अटक असून काही आरोपी अद्याप फरार आहेत,या खुनाचा मुख्य सूत्रधार म्हणून युवासेनेचा जिल्हाप्रमुख गणेश शिराळे हा अद्याप मोकाट असून पोलिसांनी कसलाही तपास केला नाही आणि भूमिका घेतली नाही,म्हणून या प्रकरणामध्ये पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसून येत आहे असे देवेंद्र ढाका यांचे म्हणणे आहे.मात्र एक महिना उलटूनही अद्याप मुख्य सूत्रधाराला आरोपी करून अटक केलेली नाही,त्यामुळे बीड मधील सर्व जनतेने अन्यायाच्या विरोधात न्याय मिळवण्यासाठी काही मागण्या घेऊन ३ नोव्हेंबर २०२५ वार : सोमवार या दिवशी भव्य जण आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे,या मोर्चामध्ये प्रमुख मागण्या पुढील प्रमाणे (१) यश ढाका खून प्रकरणातील मास्टर माईंड गणेश शिराळे यांच्यावर गुन्हा नोंद करून तात्काळ अटक करण्यात यावी. (२) घटनास्थळी हजर असणारे



व आरोपींना मदत करणाऱ्यांना सहआरोपी करावे.(३) या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी.(४) हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे.(५) सर्व आरोपींची नार्को टेस्ट करण्यात यावी.या प्रमुख मागण्या घेऊन अन्य मागण्या घेऊन हा मोर्चा ३ तारखेला सकाळी ११:०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयावर निघणार आहे. मोर्चाला बीड जिल्ह्यातील नागरिक तसेच पत्रकार बांधव,सामाजिक कार्यकर्ते व विविध पक्ष,संघटना उपस्थित राहणार असून जनतेने देखील हजारोंच्या संख्येने या अन्यायाच्या लढाईमध्ये सामील होऊन मयत यश ढाका याला न्याय मिळवून देण्यासाठी एकत्र यावे व अन्यायाच्या विरोधात आवाज उठवावा अशी विनंती आणि आव्हान पेठबीड मधील युवा नेते भारत कांबळे यांनी केली आहे.

## वरपगावच्या समस्या शासन दरबारी प्राधान्याने सोडवू–रमेशराव आडसकर

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते स्व.बाबुरावजी आडसकरांच्या राजकीय जीवनात वरपगावची साथ उल्लेखनीय आहे. आजही माझ्या परिवारा च्या राजकारणाला या गावचा मोठा पाठिंबा असल्याने यापुढे या गावच्या समस्या सोडवण्यासाठी मी अग्रक्रमाने काम करीन असे आश्वासन रमेशराव आडसकर यांनी वरपगावच्या येथील सेवा सहकारी सोसायटीच्या कार्यालयाचे भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना दिले.यावेळीकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मठाधिपती महंत ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री,तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे,माजी तालुका कृषी अधिकारी सुरेशराव खंदारे,ड. रमेशराव खंदारे,हनुमंत भोसले यांची उपस्थिती होती.केज तालुक्यातील वरपगांव येथे सेवा सहकारी सोसायटीच्या कार्यालयाचे भूमिपूजन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.यावेळी रमेशराव आडसकर यांनी भूतकाळातील अनेक आठवणींना उजाळा दिला वरपगाव सेवा सोसायटीने भविष्यात विविध उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा अंकुशराव इंगळे यांनी व्यक्त केली.यावेळी सेवा सहकारी सोसायटी कार्यालयासाठी जागा दान दिलेल्या खंदारे परिवारातील ड. रमेशराव खंदारे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हनुमंत भोसले यांनी केले.सूत्रसंचालन दिलीप बनसोडे यांनी तर आभार दिलीप देशमुख यांनी मानले.सचिव शेखर पाटील यांनी यासाठी परिश्रम घेतले.यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### राजस्थानी सहकारी पतसंस्था परळी प्रकरणी

## शाखा व्यवस्थापक दिगंबर कागले यांना अटकपूर्व जामीन मंजूर

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राजस्थानी सहकारी पतसंस्था,परळी येथील शाखा व्यवस्थापक दिगंबर रावसाहेब कागले यांना गु.र.नं.१९५/२५ परळी शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणूक व गैरव्यवहाराच्या गुन्ह्यात अटक होण्याची भीती असल्याने त्यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जाला जिल्हा व सत्र न्यायालय, अंबाजोगाई यांनी मंजुरी दिली आहे.

दि.३१ऑक्टोबर २०२५ रोजी डॉ.रचना आर.तहेरा जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी हा आदेश दिला आहे.सदर गुन्हा भारतीय



दंड विधान कलम ४२०, ४०६,४०९, ३४ तसेच चझखऊ कायदा कलम ३ आणि ४ अंतर्गत नोंद करण्यात आला आहे. न्यायालयाने काही अटी व शर्तीसह आरोपीस अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे.आरोपीच्या वतीने या प्रकरणात अडवोकेट डी.एम.काजगुंडे यांनी युक्तिवाद केला.त्यांना अड.अतूल डी.शेरेकर, अड.बी.आय.चौधरी, अड.अनिल राठोड,अड. इंगळे अक्षय यांचे सहकार्य लाभले.

सदर प्रकरणातील पुढील तपास परळी शहर पोलीस करत असून न्यायालयाच्या आदेशा नुसार आरोपीने तपासात सहकार्य करणे आवश्यक राहणार आहे.

## अंबासाखरचा २०२५ –२६ चा गळीत हंगाम आज सुरू होणार; ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री वरपगावकर यांच्या हस्ते ऊस मोळी पूजन

दैनिक वादळ वार्ता


**केज । प्रतिनिधी**

अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना अर्थात 'अंबासाखर'च्या ऊस उत्पादक शेतकरी आणि हितचिंतकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. कारखान्याचा २०२५ –२०२६ या वर्षासाठीचा गळीत हंगामाचा शुभारंभ दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे.ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते ऊस मोळी पूजन करण्यात येणार असून यंदाच्या गळीत हंगामाचा शुभारंभ एका मंगलमय वातावरणात पार पडणार आहे.कारखान्याच्या परंपरेनुसार,ऊस मोळीचे पूजन ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री वरपगावकर यांच्या शुभहस्ते केले जाणार आहे.यानंतरच प्रत्यक्ष गळीत हंगामाला सुरुवात होईल.प्रमुख उपस्थितीत या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर हे राहणार आहेत.या सोहळ्याला कारखान्याचे व्हाईस चेअरमन दत्ता आबा पाटील,राजेभाऊ औताडे यांच्यासह कारखान्याचे सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहेत. कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.डी.एस. मरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या प्रगती साठी आणि यंदाच्या हंगामाच्या यशासाठी या कार्यक्रमाला सर्व स्तरांतून मोठी उपस्थिती असणे अपेक्षित आहे.सर्वांना निमंत्रण दिले असून या मंगलमय सोहळ्या साठी सर्व ऊस उत्पादक शेतकरी,कामगार बंधू आणि कारखान्याचे हितचिंतक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी,असे स्नेह निमंत्रण कारखान्याचे चेअरमन रमेश आडसकर यांच्याकडून देण्यात आले आहे.



संपादकीय

# संधीसाधूंचा मोर्चा



महाराष्ट्रातील विरोधकांनी काल मुंबईच्या फॅशन स्ट्रीटवरून महापालिका कार्यालयापर्यंत सत्याचा मोर्चा काढला. मनसे, शिवसेना उबाठा गट, शेकाप, माकप आणि इतर विरोधी पक्ष असे, ज्यांना महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही किंमत नाही ते या मोर्चात सामील झाले होते. या मोर्चामध्ये उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि अन्य नेते त्यात शरद पवार गटाचे जयंत पाटील आदी सहभागी झाले होते. मोर्चाला नाव दिले होते सत्याचा मोर्चा. पण हा खरा संधीसाधूंचा आणि असत्याचा मोर्चा होता. कारण मोर्चात जे सहभागी झाले होते त्यांनी कशा प्रकारे भाजपला फसवून आणि भाजपच्या कुबड्या घेऊन सत्ता हस्तगत केली होती, हे दिसले आहे.राज ठाकरे यांनी तर आपल्या भाषणात 'दुबार मतदारांना दिसताच क्षणी ठोका' असा दिव्य संदेश दिला. पण राज हे अशा बोलण्यासाठीच प्रसिद्ध आहेत. काहीही न करता आपल्या वाडवडिलांची इस्टेट भोगत दुसऱ्यांना आपसात लढवायचे आणि स्वतः पोळी भाजून घ्यायची याशिवाय त्यांनी काहीही केले नाही. राज यांची अशी गत तर उद्धव ठाकरे यांची तर दुसरीच गत आहे. त्यांना महापालिकाही हातातील जाऊ द्यायची नाही, म्हणून त्याना ही संधी वाटली तर नवल नाही. त्यामुळे त्यांनीही राज यांच्या मदतीने महापालिका ताब्यात घेण्याचा निकराचा आणि शेवटचा प्रयत्न चालवला आहे. त्यामुळे त्यांचे भाषणही भडकाऊ झाले. पण जो माणूस मुख्यमंत्री असतानाही केवळ घरी बसून सरकार चालवत होता आणि त्यासाठी फेसबुक लाईव्ह करत होता आणि लोकांना उपदेशाचे डोस पाजत होता, त्याने लोकांना आता भडकवावे आणि लोकांनी त्यांच्यावर विश्वास टाकून त्याच्या पाठीमागे जावे यासारखा भाबडेपणा नाही. राज आणि उद्धव हे दोघेही संपलेले आहेत, किमान महापालिका तरी वाचवावी, यासाठी त्यांचे अपयशी प्रयत्न चालू आहेत.शेकापचे सारे पदाधिकारी भाजपमध्ये सामील झाले आहेत. त्यामुळे जयंत पाटील(शेकाप) हे कशाच्या आधारे या मोर्चात सामील झाले ते त्यांनाच ठाऊक. मुख्य प्रश्न आहे तो ठाकरे बंधूंचा. उद्धव आणि राज यांच्या हातात काहीही गमावण्यासारखे उरले नाही. त्यामुळे त्यांनी हा मोर्चा काढला आणि त्याला नाव दिले सत्याचा मोर्चा. पण तो असत्याचा मोर्चा आणि आपली शेवटची पत पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न आहे हे सिद्ध झाले. फेक नरेटिव्ह सेट करण्यासाठी यावेळी विरोधकांनी मोर्चात मतचोरीचा आरोप आणला होता. दुबार मतदारांना दिसता क्षणी ठोका, असे राज यांनी आवाहन केले, तर उद्धव यांनीही जवळपास तसेच केले. पण या मोर्चात सामील झालेले राष्ट्रवादी(शरद पवार) गटाचे शरद पवार यांनी मागे एकदा माथाडी कामगारांना दोनदा मतदान करण्याचा सल्ला दिला होता. आधी एकदा साताऱ्यात मतदान करा आणि पुन्हा नवी मुंबईत मतदान करा, असा अजब सल्ला दिला होता. तेच विरोधक आता दूबार मतदारांबाबत धमकीवजा इशारा देत आहेत. त्यात मतचोरीचेही आरोप आहेत. हे आरोप करून राहुल गांधी वारंवार प्रसिद्धी मिळवत असतात. पण राहुल गांधी हे आरोप कधीही सिद्ध करू शकलेले नाहीत. तोच कित्ता उद्धव ठाकरे आणि आता तर राज यांनीही गिरवला आहे. पण यात दोघांचेही नुकसान आहे. कारण मतचोरीचा आरोप वारंवार करूनही एकदाही सिद्ध होऊ शकलेला नाही.राज आणि उद्धव यांच्या मोर्चाला उत्तर म्हणून भाजपनेही मुंबईत प्रतिमोर्चा काढला आणि विरोधकांचा मोर्चा किती संधीसाधूंचा आहे, महापालिका वाचवण्यासाठी चालवलेले निष्फळ प्रयत्न यातून दिसतात. राज आणि उद्धव आपल्या ताकदीचा उपयोग गरीब मतदारांवर डोळे वटारण्यासाठी करत आहेत. पण याचा उपयोग होणार नाही. आता मतदार शहाणा आणि सूज्ञ आहे. त्यामुळे राज आणि उद्धव यांच्या धमकावण्याकडे आणि त्यांनी कितीही विखारी प्रचार केला आणि फेक नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला तरी लोक आता शहाणे झाले आहेत. आता पूर्वीसारखा भाबडा मतदार राहिला नाही. या पूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधानाचा फेक नरेटिव्ह सेट करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. तो फारसा यशस्वी झाला नाही. पण त्यामुळे भाजपच्या जागा कमी झाल्या. तोच कित्ता आता पुन्हा एकदा महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने गिरवण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. पण जनता हा फेक नरेटिव्ह हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही हे दिसतेच. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि अजित पवार गट हे तिघेही विरोधकांच्या या प्रचाराच्या तंत्रास बळी न पडण्यास सक्षम तर आहेतच पण विरोधकांचा डाव त्यांच्याच अंगावर उलटवण्यासही समर्थ आहेत. महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यापूर्वी सत्याचा मोर्चा काढला होता. त्यानंतर आज विरोधकांनी सत्तेचा मार्ग शोधण्यासाठी सत्याचा मोर्चा काढला आहे. पण जनता विरोधकांच्या या फेक नरेटिव्हला फसणार नाही. राज आणि उद्धव यांची भाषणे मात्र राणा भीमदेवी थाटाची झाली. पण त्यांना आता कुणीच भुलणार नाही. कारण हा मोर्चात सारे ढोंगी सामील झाले आहेत. त्यामुळे राज आणि उद्धव यांनी कितीही गर्जना केल्या तरी त्या वायाच जाणार आहेत, यात काहीही शंका नाही. मोर्चात मुंबईच्या भल्यासाठी काहीही नव्हते, तर खोटे नरेटिव्ह सेट करण्यासाठी होते. ठाकरेचीं शिवसेना तर ते वर्षानुवर्ष करत आली आहे. पूर्वी ते सारख्या मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे असा फेक नरेटिव्ह सेट करत असत. भोळे मतदार त्यांना फसतही असत. केवळ मतदाराना निवडणुकीपुरते असे भासवण्याचा प्रयत्न असे. विरोधकांचा हाही डाव यशस्वी होणार नाही आणि ही बाब वारंवार सिद्ध झाली आहे.

# पावसातली भात कापणी!



अवंधू भात बरा व्हता. मॉप तांदूळ झालो आसतो. पण या पावसावर वशाडी इली ना. हातातोंडाक गावणारो घास या पावसाच्या उच्छादान नाय करून टाकल्यान हा संवाद अवघ्या कोकणातील पालघरपासून बांद्यापर्यंत सध्या कानावर येतोय. त्याचे कारणही तसेच घडले आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिना म्हटला की उष्णतेच्या झळा सोसाव्या लागायच्या. 'ऑक्टोबर हीट' हा शब्द कानी पडायचा; परंतु यावर्षी ऑक्टोबर महिन्यात जून-जुलै महिन्यात कोसळावा तसा पाऊस कोसळत आहे. महाराष्ट्रामध्ये ऋतुचक्र कशा पद्धतीने बदलत आहे, हे गेल्या काही वर्षांमध्ये आपण पाहत आहोत. पूर्वी काही दुष्काळी जिल्हे म्हणून ज्यांची ओळख होती, त्या भागातून अलीकडे विपुल पाणीसाठा उपलब्ध आहे. काही भागातील सिंचन प्रकल्प काही प्रमाणात पूर्ण झाल्याने, ज्या भागावर दुष्काळी सावट होते, ते पाण्याने दूर होताना आपणाला पाहायला मिळत आहे. पूर्वी राज्यातील दुष्काळी भागात आकाशात दाटलेले ढग जरी गावकऱ्यांनी पाहिले, तरीही शेतकरी आनंदी व्हायचा. दुर्दैवाने तेव्हा या दुष्काळी भागात वर्ष-दोन वर्षे पाऊसच पडायचा नाही. फक्त काळवंडलेले धावणारे ढग तितके दिसायचे. जेव्हा महाराष्ट्र पावसाची आतुरतेने वाट पाहत असायचा, तेव्हा कोकण मात्र पावसाच्या पाण्याने दुथडी भरून वाहत असायचे.

एकदा जून महिन्यात कोकणात मृग नक्षत्राला पावसाने हजेरी लावली की, तो सप्टेंबर अखेर अगदी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस पडत होता आणि ऑक्टोबर महिन्यापासून पावसाचा गारवा जाऊन उन्हाच्या झळा सुरू व्हायच्या. भरपूर पडलेल्या पावसाने कोकणातील शेती बहरलेली असायची. श्रावण महिन्यातील सण, गणेशोत्सवातील गणपती विसर्जनानंतर येणारी दिवाळीची पहाटच शेतकऱ्यांसाठी आनंद आणि सुखाची नांदी घेऊन यायची. शेतातील भातपीक तयार झालेले असायचे. एकीकडे शहरी भागात राहणारे दिवाळीच्या फराळात व्यस्त असताना, कोकणातील शेतकरी मात्र त्याच्या शेतातील भातशेती कापण्यात गुंतलेला असायचा. त्याकाळी पाऊस येतच नव्हता असं नाही; परंतु परतीच्या पावसाची एखादी-दुसरी सर केवळ हजेरीपुरती असायची. भात कापणीचे काम करणाऱ्या शेतकऱ्यांची धावपळ व्हायची अगदीच नाही असं नाही; परंतु त्याचे फार काही शेतकऱ्याला वाटायचे नाही, कारण पाऊस आला म्हणेपर्यंत पावसाने उघडीप घेतलेली असायची. परंतु दुर्दैवाने यावर्षी मात्र, अवंधू भात बरा व्हता. मॉप तांदूळ झालो आसतो. पण या पावसावर वशाडी इली ना. हातातोंडाक गावणारो घास या पावसाच्या उच्छादान नाय करून टाकल्यान हा संवाद अवघ्या कोकणातील पालघरपासून बांद्यापर्यंत सध्या कानावर येतोय. त्याचे कारणही तसेच घडले आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिना म्हटला की उष्णतेच्या झळा सोसाव्या लागायच्या. 'ऑक्टोबर हीट' हा शब्द कानी पडायचा; परंतु यावर्षी ऑक्टोबर महिन्यात जून-जुलै महिन्यात कोसळावा तसा पाऊस कोसळत आहे.एकतर कोकणात अनेक कारणांनी भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी होत आहे. भातशेतीचे असणारे क्षेत्र, कोकणातील भाऊबंदकीत शेतीची झालेली वाटणी आणि वाट्याला कमी क्षेत्र आल्याने 'कशाला भातशेती करायची' म्हणून काहींनी भातशेती सोडली, तर काहींच्या मते शेतात राबणारे कुटुंबातील हातच कमी झालेत, मग शेतात कोण राबणार? 'भातशेती परवडत नाही, भातशेतीत काम करायला मजूर मिळत नाहीत,' असा काहींचा सूर आहे; परंतु काहींच्या मते भातपिकातून चांगली कमाई देखील होऊ शकते, मात्र यासाठी फार कष्ट आहेत.यावर्षी नोव्हेंबर महिना उजाडला, तरीही पाऊस काही थांबत नाही आहे. कोकणातील शेतकरी भातशेती कापताना डोळ्यांत जरूर पाणी आणतो; परंतु त्याचे फोटो किंवा व्हिडीओ तो करत नाही. जो निसर्गाने निर्माण केलेला प्रसंग आहे, त्याला सामोरे जाण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न करतो. यावर्षीच्या पावसाने शेतीचा हा हंगामच बिघडवला आहे. कोकणातील अनेक भागात आजही पाऊस कोसळत असल्याने भातकापणी सध्या भर पावसातच होत आहे. यामुळे भातकापणीनंतर गुरांना लागणारे गवतही पावसामुळे खराब होणार आहे. यामुळे कोकणातील शेतकरी खऱ्या अर्थाने चिंतेत आहे. काही गावांतून शेतात फूटभराचे पाणी आहे. या पावसाच्या पाण्यातही भातकापणी अशाच पाण्यात झाल्याने भातपीक किती हाती येईल, हे सांगता येणे अवघड झाले आहे.रायगड जिल्ह्यात आजही मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जाते. भातपीक घेणारा हा भाग आहे. पूर्वीपासूनच भातशेतीत रायगड जिल्हा अग्रभागी असतो. आजही रायगडमध्ये भातपीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते; परंतु सर्वत्रच पाऊस दररोज कोसळत असल्याने भातकापणी करणेही अवघड झाले आहे. पूर्वी नोव्हेंबर महिन्यात कधीतरी अवकाळी पाऊस यायचा; परंतु आता तर दररोज न चुकता दिवसभर पाऊस पडतो. यामुळे भातकापणीचे काम होऊ शकलेले नाही. कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कोकणातील कोकण कृषी विद्यापीठाने काही नवीन संकरित भाताची बियाणे तयार केली आहेत. या बियाण्यांचा शेतकरी आता मोठ्या प्रमाणावर फायदाही घेऊ लागले आहेत. पारंपारिक भात बियाणे आता जवळपास बंद झाली आहेत. संकरित नव्या भात बियाण्यांची पेरणी करून त्यातून दामदुप्पट उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. काही गावातील तरुण शेतकरी या संकरित भात बियाण्यांची शेतात पेरणी करून चांगले उत्पादन घेत आहेत. या तरुण शेतकऱ्यांच्या माध्यमातून भातशेतीतील बदलाचे चांगले परिणामही कोकणात दिसू लागले आहेत. कमी कष्टात, कमी खर्चात जास्त उत्पादन या संकरित भात बियाण्यातून मिळते, त्याचाच वापर केला जात आहे. पावसाने भातशेतीचे कोकणातील सर्वच जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. भातपीक चांगले आले आहे. या हंगामात भरपूर पाऊस येऊनही भाताचे पीक चांगले आले होते; परंतु भातकापणीच्या हंगामातच पाऊस कोसळत असल्याने कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत कोसळणाऱ्या पावसाने भातशेतीचे जसे नुकसान झाले, त्याचबरोबर याचा परिणाम मासेमारीवरही झाला आहे. कोकणात मासेमारीचा कोट्यवधी रुपयांची उलाढाल असणारा उद्योग आहे. कोकणात कोसळणारा पाऊस आणि कोकणच्या किनाऱ्यावरचे वादळ यामुळे कोकणात मासेमारीचा व्यवसाय ठप्प झाला आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून यलो अलर्ट, रेड अलर्ट अशा हवामान खात्याच्या अंदाजातच गेले काही महिने चालले आहेत. शेती आणि मासेमारी व्यवसायावर परिणाम करणारा हा पाऊस कधी थांबतोय, याच प्रतीक्षेत कोकणातील सर्वसामान्य शेतकरी आहे.

# सागरी महासत्तेच्या दिशेने वाटचाल...



इंडिया मेरीटाईम समिट म्हणजे मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या विविध सागरी परिषदांची एकत्र गुंफण होय. या परिषदांमध्ये भारतीय आणि आंतरराष्ट्रीय सागरी समुदायाचे प्रतिनिधी एकत्र येऊन सागरी क्षेत्रातील समस्यांवर चर्चा करण्यात आली आणि भविष्यातील विकासासाठी विचारांची देवाणघेवाण केली गेली. महाराष्ट्र मेरीटाईम समिट २०२५ मध्ये बंदरे आणि सागरी विकासाच्या संधींवर चर्चा झाली, तर इंडिया मेरीटाईम वुईक २०२५ मध्ये समुद्री उद्योगातील तज्ज्ञांनी विचार मांडले.

मागील आठवड्यात झालेल्या या कार्यक्रमात मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्ह आणि ग्लोबल मेरीटाईम सीईओ फोरमचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या फोरमला संबोधित केले. 'इंडिया मेरीटाईम वुईक २०२५' मध्ये सागरी क्षेत्रातील उद्योगांना चालना देण्यासाठी आणि भारताला या मेळाव्यात मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत २६० कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले. ज्यामुळे आर्थिक वाढीला चालना मिळणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या परिषदेचे उद्घाटन केले, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्हला संबोधित केले. या परिषदेमध्ये सागरी व्यापाराला चालना देण्यासाठी शिपिंग, बंदरे, जहाजबांधणी, क्रूझ पर्यटन आणि ब्लू इकॉनॉमी यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश होता. या परिषदेमुळे सुमारे १२ लाख रोजगार निर्माण होतील, असा दावा केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी केला आहे. या परिषदेने महाराष्ट्राला सागरी विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून स्थान मिळवून दिले आहे.या परिषदेत सुमारे १२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. जागतिक सागरी शक्ती बनवण्यासाठी मुंबईत अनेक सामंजस्य करार झाले, ज्यांचे मूल्य सुमारे १२ लाख कोटींहून अधिक आहे. या परिषदेत शिपिंग, जहाजबांधणी आणि क्रूझ पर्यटन यांसारख्या क्षेत्रांतील महत्त्वाच्या भागधारकांनी भाग घेतला होता. भारताच्या सागरी क्षेत्रात व्यापक बदल घडवून आणण्यासाठी केंद्र सरकार सज्ज असून, इंडिया मॅरिटाईम वुईक आयोजित केला गेला होता. या परिषदेतून भारतीय सागरी उद्योगाला २०४७ च्या महासंकल्पाशी संलग्न भविष्योन्मुख दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

या कार्यक्रमात जगभरातील प्रमुख जहाजवाहतूक कंपन्यांचे प्रमुख, पायाभूत सुविधा क्षेत्रातील तज्ज्ञअभ्यासक विद्यार्थी यांनी भेट दिली. र्यक्रमाच्या पूर्वसंध्येला पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स'वरून पोस्ट करत सांगितले की, भारताच्या सागरी क्षेत्रातील सुधारणा जागतिक पातळीवर प्रदर्शित करण्यासाठी ही उत्तम संधी आहे. यात गुंतवणूकदार, धोरणकर्ते, तंत्रज्ञान व विविध क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच आंतरराष्ट्रीय भागीदार सहभागी झाले होते. हरित जहाज वाहतूक, सबळ पुरवठा साखळी आणि ब्ल्यू यावेळी इकॉनॉमीच्या संधी यांसारख्या विषयांवर जागतिक नेत्यांमध्ये विचारमंथन करण्यात आले.

देशाच्या एकूण व्यापारापैकी सुमारे ९५ टक्के व्यापार समुद्री मार्गाने होतो. सागरी क्षेत्रातील संक्रमण हे परस्पर सहकार्याशिवाय शक्य नाही. सरकार, उद्योग, वित्तीय संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्र यांनी एकत्र येत विकासाला गती देणे आवश्यक आहे. शाश्वत, स्मार्ट आणि सागरी पायाभूत सुविधांसह भारत जगातील हरित शिपिंग कॉरिडॉरचे केंद्र बनण्यास भारत देश सज्ज असल्याचा विश्वासही यावेळी मांडण्यात आला. या ध्येयाअंतर्गत २०३०पर्यंत प्रति टन मालवाहतुकीवरील कार्बन उत्सर्जनात ३०%, तर २०४७ पर्यंत ७०% घट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जे एनपीटीसह प्रमुख बंदरांमध्ये शोर पॉवर, बॅटरी चलित वाहने व हरित लॉजिस्टिक्स प्रणाली कार्यान्वित केली जात आहे. या कार्यक्रमात ८५ हून अधिक देशांतील प्रतिनिधी सहभागी झाले होते. यात १ लाखाहून अधिक प्रतिनिधी, ५०० पेक्षा जास्त प्रदर्शक आणि ३५० आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी झाले होते. भारताला जागतिक ब्ल्यू इकॉनॉमीचा देश म्हणून स्थान मिळवून देण्याचा हा प्रयत्न होता. या परिषदेत सागरी व्यापार आणि उद्योगाशी संबंधित सुमारे १२ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. हरित ऊर्जा आणि पर्यावरणपूरक सागरी ऑपरेशन्सवर विशेष भर देण्यात आला. भारतातील प्रमुख बंदरे 'ग्रीन हायड्रोजन हब' म्हणून विकसित केली जात आहेत. सागरी क्षेत्रातील आव्हाने आणि संधींचा आढावा घेण्यासाठी एआय-शक्तीवर आधारित लॉजिस्टिक्स आणि तंत्रज्ञानावरील सत्रांचा समावेश होता. 'सागरमाला' कार्यक्रम आणि 'मेरीटाईम इंडिया व्हिजन २०४७' अंतर्गत बंदरांचे आधुनिकीकरण करण्याच्या योजनांवर चर्चा झाली. वाढवण बंदरामुळे १२ लाख रोजगार निर्माण होतील, असा दावा केंद्रीय नौवहन मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी यावेळी केला. भारतातील समुद्री शिक्षण आणि संशोधनाला जागतिक दर्जा मिळवून देण्यासाठी इंडियन मेरीटाईम युनिव्हर्सिटीने महत्त्वाचे पाऊल उचलले. या मुंबई इंडिया मेरीटाईम वुईक दरम्यान विद्यापीठाने जर्मनी, नेदरलँड, सिंगापूर, रशिया , दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलिया या देशातील आंतरराष्ट्रीय विद्यापीठे संशोधन संस्था आणि उद्योग संघटनांची १४ सामंजस्य करार केले. या करारांमुळे भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील शिक्षण संशोधन आणि रोजगाराच्या नव्या असंख्य संधी उपलब्ध होणार आहेत. भारताचा सागरी वारसा आणि प्रगत सुधारणा यामुळे आपला देश गेटवे ऑफ इंडिया वरून गेटवे टू द वर्ल्ड बनत आहे, असे या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले होते. प्राचीन लोथर बंदरांपासून ते उद्याच्या बंदरांपर्यंत भारत हरित सर्व समावेशक आणि समृद्ध सागरी भविष्याकडे वाटचाल करीत आहे. जागतिक गुंतवणूकदारांनी या परिवर्तनाच्या प्रवासात सहभागी व्हावे, असे आव्हान अमित शहा यांनी केले. आय एम यूद्वारे झालेल्या या १४ सामंजस्य करारामुळे द्विपदवीधर अभ्यासक्रम संयुक्त संशोधन कौशल्य वृद्धी आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिक्षण देवाण-घेवाण कार्यक्रम सुरू होणार आहेत. भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर करिअर घडवण्याच्या दिशा देतील देशाच्या सागरी अर्थव्यवस्थेला सक्षम मनुष्यबळ देण्याच्या दिशेने आयएमयूने आपली भूमिका अधिक बळकट केली.एक दशकापूर्वी, देशाचे सागरी क्षेत्र कालबाह्य कायदे आणि मर्यादित क्षमतांनी त्रस्त होते. पायाभूत सुविधा, सुधारणा आणि सार्वजनिक सहभागावर लक्ष केंद्रित करून गेल्या ११ वर्षांत या क्षेत्रात लक्षणीय बदल झाले आहेत. आज, हे क्षेत्र आधुनिक पायाभूत सुविधा, जागतिक विश्वास आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक बनले आहे. आज आपले कुशल खलाशी प्रत्येक जहाज आणि बंदराच्या केंद्रस्थानी आहेत. देशातील खलाशी कामगारांची संख्या १ लाख २५ वरून तीन लाखांपेक्षा जास्त झाली आहे. आता जागतिक खलाशी कामगारांच्या जवळपास १२ टक्के आहे. भारत आज जगातील प्रशिक्षित खलाशांच्या शीर्ष तीन पुरवठादारांपैकी एक आहे. 'इंडिया मेरीटाईम वुईक २०२५' ही परिषद भारताच्या सागरी क्षेत्राच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली. मोठ्या प्रमाणात झालेल्या गुंतवणुकीच्या करारांमुळे आणि शाश्वत विकासाच्या धोरणांमुळे भारत पुढील २५ वर्षांत 'नीलक्रांती' घडवून आणून जागतिक सागरी महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे हे या निमित्ताने सिद्ध झाले आहे.

# महेश (कडा)सह.साखर कारखान्याचा परवाना सन २०१६/ १७ मध्येच रद्द झाला आहे;भीमराव धोंडे आत्तापर्यंत काय करत होते?

## आजवर तुमच्या कारभाराच्या तक्रारी केल्या नाहीत मात्र आता लक्ष घालावे लागेल

## आमदार सुरेश धस यांचे पत्रकार परिषदेतून प्रत्युत्तर

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याला सन २०११ मध्ये शेवटचा गाळप परवाना (लायसेन्स) देण्यात आला होता त्यानंतर शुगर कंट्रोल ऍक्ट १९६६ यामध्ये सुधारणा होऊन सन २००६ मध्ये मनमोहन सिंग पंतप्रधान असताना यूपीए सरकारने कोणताही सहकारी अथवा खाजगी साखर कारखाना पाच वर्षाहून अधिक काळ बंद असेल त्याचे गाळप झालेले नसेल तर नियमाप्रमाणे त्यांचा गाळप परवाना (लायसेन्स) रद्द होत असते..या नियमानुसार (कडा) महेश सहकारी साखर कारखान्याचे लायसेन्स रद्द झाले आहे ..भीमराव धोंडे पराभूत झाले आणि मी आमदार झालो त्यामुळे मी लायसन रद्द केले आहे असे जाहीर सांगून त्यांनी माझी बदनामी केली आहे त्यामुळे आतापर्यंत त्यांच्या विरुद्ध कोणतीही तक्रार केली नाही परंतु आता त्यांच्या सर्व संस्थेतील गैरव्यवहाराच्या यापुढे तक्रारी करणार आहोत असे प्रत्युत्तर आमदार सुरेश धस यांनी दिले आहे.आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले ०८ एप्रिल २०२४ रोजी केंद्र सरकारचे अप्पर सचिव सुनील सुवर्णकार यांनी याबाबत महेश कारखान्याच्या मालकांना कळवले आहे. कडा सहकारी साखर कारखान्याच्या मूळ सभासदांची वाट लावून भीमराव धोंडे या कारखान्याचे मालक बनलेले आहेत त्यांनी चुकीच्या सल्ल्यावरून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे १९ कोटी रुपये भरून कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला ही बाब चांगली असल्यामुळे मी त्यांच्या विरोधात कुठेही काही बोललेलं नाही अथवा तक्रार केलेली नाही परंतु त्यांनी कारखाना परिसरातील काही तिरमली आणि मागासवर्गीय कुटुंबीयांना परिसरातून हाकलून देण्याचा प्रयत्न केला .वास्तविक पाहता त्यांनी १९ कोटी रुपये भरण्याऐवजी साखर आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन घेणे गरजेचे होते आणि त्यानंतर पैसे भरण्याची आवश्यकता होती गेली १४ वर्षे कारखाना बंद असताना आमदार सुरेश धस यांनी साखर कारखान्याचे लायसन्स रद्द केले असे म्हणत आहेत कोणत्याही आमदाराला कोणत्याही साखर कारखान्याचा परवाना रद्द करण्याचा अधिकार असता तर राज्याला एकही कारखाना सुरू राहणार नाही. केवळ महेश साखर कारखान्याचा परवाना रद्द झाला नसून महाराष्ट्रातील आणखी १७ सहकारी अथवा खाजगी कारखाने असून १९ कारखाने कर्नाटकातील आहेत या सर्व कारखान्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भीमराव धोंडे यांनी माझ्या विरुद्ध निवडणूक लढवून ते पराभूत झाले भारतीय जनता पार्टीच्या विरुद्ध काम केले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि.२९ एप्रिल २० २५ रोजी केंद्र शासनाकडे त्यांना लायसन्स पुन्हा मिळावे यासाठी पत्र दिले. तत्पूर्वी साखर आयुक्तांनी त्यांचा प्रस्ताव नाकारला दिल्ली येथील वाणिज्य विभागाने प्रस्ताव नाकारला अखेर भीमराव धोंडे यांनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठामध्ये दि.१८ ऑगस्ट २० २५ रोजी लबाडी करून सन २०१८, २०१९ मध्ये गाळप परवाना मिळाल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.



तरी मी काहीही बोललेलो नाही मी अंभोरा येथे कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला जयदत्त ऍग्रो या नावाने मला लायसन मिळाले होते परंतु मी मुदतीमध्ये चालू न केल्यामुळे जयदत्त ऍग्रो चे देखील लायसन रद्द झाले मी पुन्हा प्रयत्न केला परंतु जयदत्त ऍग्रो या नावाने पुन्हा लायसन्स मिळणार नाही असा कायदा असल्यामुळे मी साईराम या नावाने नवीन नोंदणी करून दोन-तीन वर्ष अथक प्रयत्न केल्यामुळे मला दि.११ मार्च २०२५ रोजी लायसन्स प्राप्त झाले आहे. दोन कारखान्यामधील अंतराचे केंद्र शासनाचे आणि महाराष्ट्र शासनाचे वेगळे नियम आहेत त्यानुसार सर्व तपासण्यापूर्ण होऊन ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर आमच्या कारखान्यास लायसन्स मिळालेले आहे.

अंभोरा कारखान्याविषयी मी आज बोलणे योग्य होणार नाही मी ते माझ्या कृतीतून योग्य वेळी माहिती देईल.भीमराव धोंडे साहेब यांच्याकडे संस्था आहेत,पैसा आहे,भरपूर कर्मचारी आहेत, यांना घेऊन त्यांनी धरणे आंदोलने करत राहावीत बीडला झाले, आता पुण्याला जावे, त्यानंतर दिल्लीला जावे, यामध्ये आपल्या भागातील वाहन चालक मालकांचा फायदा होत आहे. आणि अखेर काहीच झाले नाही तर सर्वोच्च न्यायालयात जाऊन त्यांनी परवाना मिळवावे असे सांगत चार टर्म विधानसभा सदस्य राहिलेल्या भीमराव धोंडे यांना शुगर कंट्रोल ऍक्ट बाबत माहिती नसावी ही हास्यास्पद बाब असल्याची सांगत त्यांना चुकीचे सल्लागार आहेत असे दिसून येत असल्याचे ते म्हणाले,बीड येथील वक्तव्यामध्ये भीमराव धोंडे म्हणाले की, कडा सहकारी साखर कारखाना हा कदम, आजबे, थोरवे, वाळके या घराण्यांनी उभा केला आहे हे खरे आहे भीमराव धोंडे यांनी हे कबूल केल्यामुळे त्यांचे आभार परंतु आपण या मूळ सभासदांच्या घरातील एखादा तरी सभासद शिल्लक ठेवला आहे का? काय असा घनाघाती आरोप करून आमदार सुरेश पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे साहेबांनी साखर कारखाना ही संस्था आईप्रमाणे न सांभाळता ती बाईप्रमाणे सांभाळली असून त्यामुळे संस्था डबघाईला आली तरुणाईला रोजगार देण्याच्या गोष्टी आपण करत आहात परंतु कडा कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना आपण काय न्याय दिला हजारो कामगारांची जीवन आपण बरबाद केले आहे. अर्धे अधिक कामगार मृत्युमुखी पडले असून वारसांना अद्यापही त्यांचे येणे रक्कम मिळालेली नाही.आज काही कामगारांची वय ७५ वर्षे झाले आहे. त्यांना न्यायालयाने ४५ कोटी देण्यात यावेत असे आदेश आहेत परंतु त्यांना अद्यापही काहीही रक्कम देण्यात आलेली नाही नवीन रोजगार देण्याऐवजी ज्यांचे रोजगार हिरावले आहेत. त्यांचे पैसे अगोदर द्या असे आवाहन केले कडा कारखान्याकडे बीड जिल्ह्या मध्यवर्ती सहकारी बँकेचे २० कोटी रुपये कर्ज बाकी असून या बँकेच्या ना हरकत प्रमाणपत्र शिवाय कोणीही कर्ज देऊ नये असे पत्र तत्कालीन प्रशासक अविनाश पाठक यांनी दि.२७ मार्च २५ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला दिलेल्या आहे. महेश मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी हे केंद्र शासनाच्या विभागांतर्गत येते राज्य शासनाच्या सहकार विभागाचा काहीही संबंध नसताना महेश मल्टीस्टेट बोजा कमी करण्याचे पत्र कसे देऊ शकते हे चुकीचे आहे असे सांगत भीमराव धोंडे यांनी महेश साखर कारखान्याच्या परवान्याबाबत माझा बादरायण संबंध जोडला आहे. माझी बदनामी केली आहे केला आहे. त्यामुळे यापुढे महेश मल्टीस्टेटचे पैसे कुठे कुठे गुंतवले आहेत.कॅन्सर हॉस्पिटल साठी किती कर्मचाऱ्यांचे पगार कपात केले आहेत.याची देखील माहिती मला आहे असे सांगत.पुढे बोलताना आ.धस म्हणाले,भीमराव धोंडे यांनी यापुढे परत भाजपा, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे आणि आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांचे कडे जाण्याच्या तयारीत आहेत त्यासाठी त्यांनी एका राजकीय आघाडीची निवडणूक आयोगाकडे नोंदणी करून कुलूप किल्ली हे चिन्ह घ्यावे कारण त्यांनी सर्व सहकारी संस्थेला कुलूप लावलेले आहे असा मिस्कील टोलाही आ.धस यांनी शेवटी लगावला.

## वीजबिलांचा अन्याय पेटणार–३० ऑक्टोबरला बिलांची होळी, ५ नोव्हेंबरला रयत क्रांतीचा जाहीर एल्गार!

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**



ग्राहकांच्या हक्कांवर महावितरणने चालवलेल्या अन्यायाच्या कारभाराविरोधात रयत क्रांती संघटनेने आता थेट रणशिंग फुंकले आहे! मराठवाड्याचे लढवय्ये नेते शिवाजी समर्थ पेटे यांनी आज जाहीर इशारा देत सांगितले की – २२ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनाकडे महावितरण अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. आमच्या मागण्यांकडे बोट दाखवून कोणी दुर्लक्ष करणार नाही. ३० ऑक्टोबर रोजी आम्ही महावितरण कार्यालयासमोर अन्यायकारक बिलांची होळी करणार आहोत! आणि तरीही प्रशासन झोपेत राहिलं, तर ५ नोव्हेंबरला ग्राहकांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयाला घेराव घातला जाईल! संघटनेने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, सरकार व महावितरण या दोघांनी लोकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. अन्यथा लोकशाही मार्गाने पण जोरदार आंदोलन पेटेल. गेल्या अनेक महिन्यांपासून ग्राहकांना अवास्तव बिलांनी लुटले जात असताना, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली आहे. दरम्यान अनेक वेळा निवेदनं, तक्रारी, अर्ज दिले गेले, पण अधिकाऱ्यांच्या कुंभकर्णी झोपेतून प्रशासन बाहेरच आलेले नाही! आता मात्र जनता पेटली आहे – बिलांची होळी ही फक्त चेतावणी आहे; जर निर्णय झाला नाही, तर रयत क्रांती संघटना रस्त्यावर उतरणार आणि सरकार हादरवणार!

## कंधार येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री शिव महापुराण कथाचे आयोजन!

### ११ कुंडी श्री महारूद्र याग यज्ञ सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

कंधार येथे प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री केदारेश्वर मंदिर स्वप्नभुमी येथे दि.१० ते १२ नोव्हेंबर दरम्यान ११ कुंडी महारूद्र याग यज्ञ संपन्न होणार आहे. तर दि.१७ नोव्हेंबर पर्यंत हरिनाम सप्ताह व शिव महापुराण कथा आयोजीत करण्यात आल्याचे पत्रक मंदिराचे पुजारी ह.भ.प.मारोती मुंजाजी सगळे यांनी काढले आहे. परिसरातील भाविक भक्त उपस्थित राहुन शोभा वाढवावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

श्री संत शिरोमणी सदगुरु नामदेव महाराज उमरजकर व श्री प.पु.स्वानंद सुख निवासी सदगुरू ज्ञानोबा माऊली महाराज कुरूळैकर यांच्या कृपा आशिर्वादाने दि.१० नोव्हेंबर पासुन ते १७ नोव्हेंबर पर्यंत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १० ते १२ दरम्यान ११ कुंडी श्री महारूद्र याग यज्ञ सोहळा होणार आहे. तर हरिनाम सप्ताह निमित्ताने दररोज १२:३० ते ४ दरम्यान श्री. भ. प. शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर यांच्या सुमधूर वाणीतुन श्री शिव महापुराण कथा ऐकण्यास मिळणार आहे. हयाच सप्ताह दरम्यान दररोज पहाटे ४- ६ काकडा भजन, ७-११ महारूद्र याग यज्ञ, ६-९ ज्ञानेश्वरी पारायण, ९-१० श्री शंकर महाराज स्वामी यांच्या हस्ते श्री अभिषेक, १०-१२ तुकाराम गाथा भजन, १२:३०-४ श्री शिव महापुराण कथा, ४-५ महाप्रसाद, ५-६:३० हरिपाठ, ८:३०-१०:३० हरिकिर्तन, ११-१ हरिजागराचा कार्यक्रम नित्य नियमाने होणार आहे.तर हरिकिर्तनास ह. भ. प. नारायण महाराज शिवणखेडकर, ह.भ.प.माधव महाराज देवकते, ह. भ. प. रोहिदास महाराज कळकेकर, ह. भ. प. शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर, ह.भ.प.विकास महाराज धसवाडीकर, ह. भ. प. कु. ज्ञानेश्वरी दिदी सुरनर, ह.भ. प. दता महाराज वळसंगवाडीकर, ह.भ.प.रमेश महाराज बुचाले यांच्या वाणीतुन हरिकिर्तन होणार आहे.ह्या सर्व धार्मिक कार्यक्रमांस कुरूळा,पाताळगंगा, उमरज, वाढवण, कारतळा, परभणी, संगमवाडी स्वप्नभुमी केदारेश्वर येथील भजनीमंडळ उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे १६ नोव्हेंबर रोजी गौळणी व एकनाथी भारूडाचा कार्यक्रम होणार आहे. ह्या सप्ताहातील सर्व धार्मिक कार्यक्रमांस भाविक भक्तांनी, दिंडी चालकांनी उपस्थिती देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन संयोजक तथा केदारेश्वर मंदिरांचे पुजारी मारोती मुंजाजी सगळे महाराज यांनी केले आहे.

## महाड येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा ६८ वा वर्धापन दिन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचा ६८ वा वर्धापन दिन ऐतिहासिक महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह क्रांतीभूमीवर साजरा होणार आहे. हा कार्यक्रम सोमवार, दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आला असून, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडणार आहे.

या कार्यक्रमात अहिल्यानगर शहर, जिल्हा व तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी केले आहे.

महाडच्या चवदार तळ्याची क्रांतीभूमी ही भारतीय सामाजिक इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण जागा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली इथूनच समानता आणि मानवतेचा संदेश दिला गेला होता. त्या पवित्र भूमीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा हा ६८ वा वर्धापन दिन साजरा होत असल्याने या सोहळ्याला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमासाठी पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अविनाश मातेकर, राष्ट्रीय अध्यक्षा सीमाताई आठवले, युवा नेते जीत आठवले, प्रदेशाध्यक्ष राजेश सरवदे, प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, राज्य उपाध्यक्ष व संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, तसेच राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सर्व नेत्यांच्या उपस्थितीत पक्षाच्या पुढील वाटचालीचा आणि आगामी निवडणूक धोरणाचा आराखडा सादर केला जाणार आहे.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले या वर्धापन दिन सोहळ्याच्या निमित्ताने पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. लवकरच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार असल्याने, या मेळाव्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, निवडणुकीतील रणनीती ठरविणे आणि समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाचे पुढील पाऊल निश्चित करणे, या मुद्द्यांवर आठवले मार्गदर्शन करणार असल्याची माहिती सुनील साळवे यांनी दिली.

जिल्हाध्यक्ष साळवे यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महाड येथील चांदे मैदान, क्रांतीभूमी, तालुका महाड, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. हा केवळ वर्धापन दिन नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्मरण आणि समाज परिवर्तनाच्या चळवळीला नवचैतन्य देणारा सोहळा ठरणार आहे.

# भारतरत्न प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे ना.पाटील व ना.नाईक यांच्या हस्ते अनावरण

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर । प्रतिनिधी**

विश्वरत्न, भारतरत्न प.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा उदगीर शहरात उभारावा अशी गेल्या अनेक दशकापासुनची समाज बांधवांची मागणी होती. त्यांच्या मागणीचा विचार करुन कोट्यावधी रुपये खर्च करुन माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या संकल्पनेतुन पुर्णाकृती उभारला असुन शहरातील नांदेड - बीदर रोडवरील मुख्य रस्त्यालगत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व पर्यटन, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले.या प्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खा.प्रा.जोगेंद्र कवाडे, माजी क्रीडामंत्री तथा आ. संजय बनसोडे, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ.अमोल मिटकरी, भदंत उपगुप्त महाथेरो, भंते पय्यानंद, भंते नागसेन बोधी, सौ.शिल्पा बनसोडे, साताऱ्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, उषा कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व्यंकट बेद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सोमानाथ जाधव, भरत चामले, समीर शेख, ब्रह्माजी केंद्रे, रामराव बिरादार, जळकोटच्या नगराध्यक्षा प्रभावती कांबळे, उपनगराध्यक्ष मन्मथ किडे, उदगीर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, जळकोट राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संग्राम हासुळे पाटील, भाजपाचे जळकोट तालुकाध्यक्ष सत्यवान पांडे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत टेंगटोल कार्याध्यक्ष वसंत पाटील, विठ्ठल चव्हाण, संतोष तिडके, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, अभिजीत औटे, तात्या पाटील, श्याम डावळे, बाळासाहेब मरलापल्ले, गोविंद ब्रह्मांना, अमोल अनकल्ले, मनोज पुदाले, रामराव राठोड, बालाजी केंद्रे, अनिल मुदाळे, अनिरुध्द गुरुडे, आदी उपस्थित होते.

**यावेळी महागायक आदर्श शिंदे यांच्या भिमगितांचा कार्यक्रम संपन्न झाला.**

भारतरत्न डॉ. आंबेडकर चौकात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फटाक्यांच्या भव्य आतिषबाजीत महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण संपन्न झाले. यावेळी पुजनीय भिक्खु संघ उपस्थित होते.

भारतरत्न प.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुर्णाकृती पुतळा उभारल्याबद्दल माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांचे समाजबांधवांच्या वतीने आभार व्यक्त केले जात आहेत.



# बोरद येथे घंटागाडीचे आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
**बोरद । वार्ताहर**

देशाला २०४७ पर्यंत महासत्ता बनविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे प्रयत्नशील आहेत. या उद्दिष्टपूर्तीसाठी गावोगाव विकास साधला गेला पाहिजे. प्रत्येक सरपंचाने आपल्या गावाच्या प्रगतीसाठी जबाबदारीने काम करावे तसेच ग्रामस्थांनी स्वच्छतेसाठी सहकार्य करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश दादा पाडवी यांनी केले.बोरद ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात सरपंच अनिता भिलाव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित घंटागाडी लोकार्पण सोहळा व ओला-सुका कचरा व्यवस्थापनासाठी बादली वाटप कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रत्येक कुटुंबाला एक अशा साडेतीन हजार बादल्यांचे वाटप करण्यात आले. या बादल्या १५व्या वित्त आयोगातून देण्यात आल्या असून ५% पेसा योजनेतून गावातील १३ पंचांना प्रत्येकी २० खुर्च्या, अशा एकूण ६० खुर्च्या वाटप करण्यात आल्या.या कार्यक्रमात उपसरपंच संतोष ढोडरे, सदस्य साजन शेवाळे, अजय मगरे, नीलिमा जाधव, ज्योतीबाई साळवे, लताबाई पवार, निळूबाई ठाकरे, माजी पंचायत समिती उपसभापती विजयसिंग राणा, बोरद विकास सोसायटी संचालक जितेंद्र पाटील, वाईस चेअरमन गणेश चौधरी, माजी जि.प. सदस्य प्रकाश वळवी,नारायण ठाकरे, रवींद्र वरसाले विनोद पवार, शांतीलाल पवार, तालुका भाजप अध्यक्ष दरबारसिंग पाडवी, मंगेश पाटील गौतम भिलाव विनोद शेवाले दिपक जाधव बैसिग पवार इ मान्यवर उपस्थित होते.

आमदार पाडवी पुढे म्हणाले की, गाव स्वच्छ ठेवण्यासाठी घंटागाडी माझ्या निधीतून दिली आहे. प्रत्येकाने घर आणि गल्ली स्वच्छ ठेवावी. रोज घंटागाडी आल्यावर ओला व सुका कचरा वेगळा करून द्यावा. स्वच्छता ही केवळ ग्रामपंचायतीची नव्हे तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.तसेच त्यांनी सांगितले की, देव मोगरा मातेच्या परिसरात दोन दिवसांत हॅन्डपंप बसविण्यात येईल. गावात लग्न समारंभ किंवा उत्तरकार्यांसाठी लागणाऱ्या वस्तूंसाठी स्वतंत्र साहित्य संच ग्रामपंचायतीला त्यांच्या निधीतून देण्यात येणार आहे. जनतेच्या तळागाळातील कार्य करणाऱ्यालाच जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीची उमेदवारी मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रवींद्र भिलाव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी निलेश राजपूत, रवींद्र ठाकरे, हुण्या ठाकरे, मंगलसिंग राजपूत, बबलू राजपूत यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.





## डॉ.संपदा मुंडे हत्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या

# न्यायाधीशाची नेमणूक करून सखोल चौकशी करावी-वसंत मुंडे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

डॉ.संपदा मुंडे यांच्या हत्या प्रकरणी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात खळबळ माजली असून यास राजकीय नेते व प्रशासन जबाबदार असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.प्रशासना मार्फत वेगवेगळ्या समित्या चौकशी करिता नेमल्या जातात पण त्यात राजकीय व प्रशासकीय हस्तक्षेप असल्यामुळे त्यांच्या कडून निपक्ष:पणे संबंधित घटनेच्या मुद्दे निहाय चौकशी केली जात नाही.स्वत:मुख्यमंत्री फलटनला जाऊन भाजप च्या राजकीय नेत्यांना चौकशी न करता अभय भाषणात देतात.डॉ.संपदा मुंडे ह्या गरीब शेतकरी कुटुंबातल्या असून मौजे कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रोजंदारी करणारे कुटुंब आहे.त्या कुटुंबावर खूप मोठ्या प्रमाणात संकट कोसळले असून यामध्ये जबाबदारी राजकीय नेते व प्रशासकीय यंत्रणेमार्फत दबावापोटी हॉटेल मधुदिप मध्ये आत्महत्या केली नसून हत्या करण्यात आली आहे.या हत्येस जबाबदार भाजप चे माजी खा.रणजीत सिंह नाईक निंबाळकर त्यांचे दोन पी ए,पीएसआय गोपाळ बदने घरमालक बनकर तसेच हॉटेलमध्ये संचालक दिलीप सिंह भोसले व त्यांचे कर्मचारी यांची संपूर्ण मुद्देनिहाय चौकशी करण्यात यावी व त्यांचे मोबाईल जप्त करून



कॉल रेकॉर्डिंग तपासावेत अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली. दवाखान्यात सेवेसाठी रात्री बेरात्री शवविच्छेदना साठी डॉक्टर संपदा मुंडे यांना बोलावून घेऊन महिला असूनही त्रास दिला जात होता. भाऊबीजच्या दिवशी दिवाळी असतानाही २३ सप्टेंबर २०२६ ला तळ हातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली नसून हत्या करण्यात आली आहे,यास सर्वस्वी राजकीय नेते व प्रशासन जबाबदार असून मेडिकल रिपोर्ट फिट प्रमाणपत्र बदलून देण्यासाठी मोठे शडयंत्र रचून लैंगिक शारीरिक छळ,मानसिक त्रास दिलेल्या असल्या मुळे मा.उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशा मार्फत संपूर्ण प्रकरणाची निपक्षपद्धतीने तपासणी मुद्दे निहाय करून कायदेशीर गुन्हेगारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने सिरसदेवीतील बंडू पटाईत या शेतकऱ्याची आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

यावर्षी संपूर्ण गेवराई तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. हातचे पीक गेल्याने बँकेचे कर्ज भरायचे कसे? हा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे. यातच सिरसदेवी येथील हातबल झालेल्या तरुण शेतकरी बंडू पटाईत यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने आणि त्यातच गोदावरी नदीपात्र आणि सिंदफना नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी आल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे आतोनात नुकसान झाले आहे. उभे पीक आणि पशुधन गेल्याने शेतकरी हातबल



झाले आहेत. हातचे पीक गेल्याने बँकेकडून घेतलेले कर्ज भरायचे कसे? आणि घर चालवायचे कसे? हा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची मनस्थिती ढासळली आहे. याच परिस्थितीत सिरसदेवी येथील हातबल झालेल्या तरुण शेतकरी बंडू पाटाईत यांनी दिनांक १ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या आत्महत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता सिरसदेवी येथील स्मशानभूमीवर स्व बंडू पटाईत यांच्यावर दु:खद वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार सुनील धांडे, माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बंडू पटाईत हे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांचे अत्यंत कट्टर समर्थक होते.

# बीड मध्ये डॉ. संपदा मुंडे आत्महत्येप्रकरणी एस.डी.पी.आय.तर्फे निवेदन-निष्पक्ष चौकशी व आरोपींवर कठोर कारवाईची मागणी!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

डॉ. संपदा मुंडे यांच्या संशयास्पद आत्महत्येच्या (हत्या) प्रकरणी संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, पीडित कुटुंबास न्याय मिळावा आणि जबाबदार व्यक्तींनी आपल्या नैतिक जबाबदारीचा स्वीकार करून तत्काळ राजीनामे द्यावेत, अशी मागणी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया ( एस डी पी आय ) बीड जिल्हा शाखेच्यावतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.या प्रसंगी एस डी पी आय बीड जिल्हाध्यक्ष सय्यद आबेद अब्बास यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी तसेच विविध



सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी कॉ.नितिन जायभाये (अध्यक्ष शहर बचाव मंच), माऊली शिरसाट( ओबीसी नेते व सामाजिक कार्यकर्ते), डॉ. संजय तांदळे (मातृभूमी प्रतिष्ठान), डॉ. साक्षी ताई जोगदंड,लेक लाडकी अभियान चे बाजीराव ढाकणे, खंडुभाऊ जाधव (वंचित बहुजन आघाडी), रोशन केकान (सामाजिक कार्यकर्ते) आणि इतर मान्यवर उपस्थित होते. निवेदनात असे नमूद करण्यात आले की,डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली नसून, त्यांना दीर्घकाळ चाललेल्या मानसिक छळामुळे आणि काही उच्च पदस्थांच्या दबावामुळे आत्महत्या करावी लागली आहे. त्यामुळे या प्रकरणी गुन्हेगारांवर तात्काळ कलम लावून कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली.तसेच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रुपाली चाकणकर यांनी या घटनेबाबत पीडितेच्या चारित्र्यहननासारखी विधाने केली असल्याने त्यांनी आपल्या पदाचा तत्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.निवेदन स्वीकारताना प्रशासनाने गंभीरतेने बाब हाताळण्याचे आश्वासन दिले. तथापि, एस डी पी आय बीड जिल्हा शाखेने इशारा दिला की, जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर बीडमध्ये मोठं आंदोलन उभारण्यात येईल.

# पोलीस स्टेशन सिंदी (रेल्वे) तर्फे रन फॉर युनिटीचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

राष्ट्राचे ऐक्य, अखंडता आणि देशभक्तीचा संदेश जनमानसात पोहचविण्याच्या उद्देशाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन पोलीस स्टेशन, सिंदी (रेल्वे) तर्फे करण्यात आले.या उपक्रमात लहान मुलांपासून ते प्रौढ व्यक्तींपर्यंत सुमारे २५० नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. धावण्याची सुरुवात शुक्रवार, सकाळी ६ वाजता बसस्टँड चौकातून होऊन पिपरा पुलापर्यंत अशी सुमारे ४ किमी अंतराची धाव पार पडली.

स्पर्धेत पुरुष गटात सचिन झाडे यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर महिला गटात रोशनी ढोबळे, प्रौढ गटात सुधाकर वाघमारे, आणि बालगटात उत्कर्ष मडावी यांनी विजेतेपद मिळवले. तसेच मोहन सुरकार व इतर १८ स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली.विजेत्यांना वर्धा जिल्हा शांतता समिती सदस्य अशोकबाबू कलोडे, नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी अश्विनी आईटवार, पोलीस निरीक्षक नरेंद्र निस्वादे व प्रफुल्ल डफे यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.या कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, पोलीस अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सहभागींना कॅप, पाणी बॉटल, केळी व बिस्किट पॅक देण्यात आले.

# एकता दौड उत्साहात पार-सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त युवकांचा सहभाग




दैनिक वादळ वार्ता
**लोहारा । प्रतिनिधी**

देशाचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने एकता दौड (ठींप षीं णपळीं) चे आयोजन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. ही दौड लोहारा तहसील कार्यालयापासून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उत्साहात संपन्न झाली.

या दौडीत शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी, पोलीस कर्मचारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दौडीदरम्यान एकता अमर रहे, भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यावेळी त्यांनी सरदार पटेल यांच्या कार्याचे स्मरण करून सांगितले की, देशाच्या एकतेसाठी त्यांनी दिलेले योगदान प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. युवकांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजात एकतेचा संदेश पसरवावा.कार्यक्रमाचे संपूर्ण कार्यक्रमात पोलीस विभाग, शिक्षक व स्वयंसेवकांनी उत्कृष्ट सहकार्य केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी एक भारत, श्रेष्ठ भारत या घोषवाक्याने राष्ट्रीय एकतेचा संकल्प पुन्हा दृढ केला.

# पंचशील विद्यालयात दिवंगत गृहमंत्री सरदार पटेल आणि दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
**हदगांव । प्रतिनिधी**

शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात देशाचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान दिवंगत भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनूले यांनी प्रतिमा पुजन करून अभिवाद केले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बंड्रेवार,जेष्ठ शिक्षक दिगंबर ताडेवाड,परीक्षा विभाग सहाय्यक सुनील सूर्यवंशी,ग्रंथपाल सतीश प्यादेकर, प्रयोगशाळा सहाय्यक वैभव टाले, सह आदि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रतिमा पूजन करून अभिवादन केले.

## मत चोरीविरोधात मुंबईत विरोधकांचा सत्याचा मोर्चा

# तर प्रत्युत्तरात भाजपचे मूक आंदोलन, परवानगी न घेतल्यामुळे दोघांवर कारवाईची शक्यता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

मतदार यादीतील घोळ आणि कथित मतचोरी विरोधात आज (१ नोव्हेंबर) मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी सत्याचा मोर्चा काढला होता. तर त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजपच्या वतीने मूक आंदोलन करण्यात आले. मात्र, या दोन्ही आंदोलनासंदर्भात एक मोठी कायदेशीर अडचण समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परवानगीशिवाय मोर्चा आणि आंदोलन केल्याप्रकरणी विरोधी पक्षांच्या 'सत्याच्या मोर्चा'तील आयोजकांवर तसेच भाजपने केलेल्या 'मूक आंदोलना'तील आयोजकांवरही आता गुन्हा दाखल होणार आहे.आज मुंबईत सर्व प्रमुख विरोधी पक्ष (राज ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार, बाळासाहेब थोरात) आणि सत्ताधारी भाजप (भाजपने केलेले मूक आंदोलन) यांनी आपापले राजकीय शक्तीप्रदर्शन केले. परंतु, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही आंदोलनांसाठी मुंबई पोलिसांकडून योग्य ती कायदेशीर परवानगी घेण्यात आली नव्हती. त्यामुळे मतचोरीच्या विरोधात 'सत्याचा मोर्चा' काढणाऱ्या




आयोजकांवर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती मिळत आहे. तर भाजपने विरोधकांना प्रत्युत्तर देण्यासाठी केलेल्या 'मूक आंदोलना'च्या आयोजकांवरही परवानगीशिवाय आंदोलन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.या प्रकरणी मोर्चाचे आयोजक असलेल्या आघाडीतील काही प्रमुख नेत्यांवर पोलिस कारवाई होण्याची शक्यता आहे. हे गुन्हे आझाद मैदान पोलीस ठाणे आणि डी बी मार्ग पोलीस ठाण्यांतर्गत (झोन २) दाखल होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.मतदार याद्यांच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी रस्त्यावर उतरून निवडणूक आयोगाला आव्हान दिले होते. तर भाजपने लगेचच मूक आंदोलन करून विरोधकांच्या मोर्चाला प्रत्युत्तर दिले. मात्र, आता या दोन्ही राजकीय एल्गारांना कायदेशीर प्रक्रियेचा सामना करावा लागणार आहे. दरम्यान, दोन्ही बाजूंकडून मोठ्या संख्येने कार्यकर्ते मुंबईत जमल्याने शहरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत कोणतीही अनुचित घटना घडू दिली नाही. तथापि, आता या मोर्चा आणि आंदोलनाच्या परवानगीविना आयोजनामुळे विरोधकांसोबतच भाजपलाही कायदेशीर अडचणीत यावे लागू शकते, असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. आता या दोन्ही बाजूचे आयोजक आणि नेते या कायदेशीर कारवाईवर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077